Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)

Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India

Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/

ISSN (Online): 2583-8423

Volume 1, Issue 4, October 2023; Pages 56 – 59

DOI: 10.5281/zenodo.8335741

Original Research Article

# हैदराबाद मुक्तीचे १०९ तास

डॉ. ओमशिवा लिगाडे

सहयोगी प्राध्यापक, इतिहास विभाग, शिवजागृती महाविद्यालय नळेगाव ता. चाकूर जिल्हा लातूर ४१३५२४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: omshivaligade@gmail.com

Received: 10 September, 2023 | Accepted: 11 September, 2023 | Published: 13 September, 2023

**महत्वाचे शब्द**: मराठवाडा मुक्तिसंग्राम, रजाकार, निजाम, हैदराबाद संस्थान

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी भारतामध्ये छोटी मोठी अशी एकूण ५६५ संस्थाने होती. १५ ऑगस्ट १९४७ रोजी जेव्हा भारताला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा त्यापैकी ५६२ संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन झाली. मात्र हैदराबाद, काश्मीर आणि जुनागड या संस्थांनानी स्वतंत्र राहण्याचा निर्णय घेतला. भारतीय संघराज्यात सामील होण्यास नकार देणाऱ्या तीन संस्थांनापैकी सर्वात मोठे संस्थान हैदराबादचे होते. हैदराबाद संस्थानाचा शासक निजाम हा स्वातंत्र्यपूर्व काळात ब्रिटिशांनी संरक्षण देऊन वाढवून ठेवलेला संस्थानिक होता. निजामाने संस्थान खालसा करून भारतीय संघराज्यात सामील होण्यास नकार दिल्यामुळे १५ ऑगस्ट १९४७ रोजी अधिकारावर आलेल्या भारत सरकारतर्फे निजामाशी बोलणे सुरू झाले. त्या काळात इतेहादुल मुसलमीन या संघटनेचा नेता कासिम रजवी याचे प्राबल्य प्रचंड वाढलेले होते. निजामाने सरदार पटेल यांच्याशी किंवा स्वतंत्र भारताच्या सरकारशी कोणत्याही वाटाघाटी करण्याची गरज नाही, अशी त्याची भूमिका होती. यादरम्यान कासिम रजवी याने रजाकरांची संख्या वाढवली आणि गावोगावी अत्याचाराचे एक नवे पर्व सुरू केले. केवळ राजकीय विरोधकांच्याच नव्हे तर इतरही गोरगरिबांच्या हत्या घडवणे, दंगली करणे, लूटमार करणे, गैरमुस्लिम जनतेत दहशत माजवणे अशा बाबी कासिम रजवीच्या रजाकरांनी सुरू केल्या. संस्थानातील नागरिक आणि स्वातंत्र्यसैनिक यांच्याशिवाय भारतीय सीमेवरील खेडी आणि चौक्यावरही रजाकारांनी हल्ले सुरू केले. सगळीकडेच त्यांनी प्रचंड विध्वंस आणि रक्तपात सुरू केला. रजाकरांच्या या कारवायांना निजामाची मूक संमती होती.[१]

दरम्यानच्या काळात निजामाच्या लायक अली सरकारने सैन्याची जमवाजमव सुरू केली होती. तस्करामार्फत शस्त्रास्त्रे आयात करणे, सैन्यात कडव्या धर्मांध मुस्लिमांची भरती करणे आणि सिमेपलीकडील भारतीय सैन्यांच्या तळावर

चोरटे हल्ले करणे असे प्रकार निजामाचे सैन्य करीत होते. रझाकार आणि निजामाच्या सैन्याने केलेल्या हल्ल्यांना मराठवाड्यातील सशस्त्र कॅम्पवरून जोरदार प्रतिकार होत होता. हैदराबाद मुक्तीलढ्यातील स्वातंत्र्य सैनिकांचा संघर्षही आता शिगेला पोहोचला होता. खरे तर भारत सरकारने निजामाशी जुळवून घेण्याचे प्रयत्न आणि चर्चेच्या माध्यमातून प्रश्न सुटावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले. परंतु त्यातून काहीच निष्पन्न झाले नाही. स्वतः निजाम व इतेहादुल मुसलमीन, रझाकार व विशेषता कासिम रजवी या सर्वांनी भारताने केलेले तडजोडीचे सर्व प्रयत्न अपयशी ठरवले. उलट ते भारत सरकारच्या विरोधात कटकारस्थान रचतच राहिले. भारताचे पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू मद्रास येथील जाहीर सभेमध्ये बोलताना म्हणाले होते की, 'गेल्या सहा महिन्यात हैदराबाद गुंड, चोर यांना शोभेल अशा रीतीने वागले आहे. मी असेच म्हणेन की गरज पडेल तेव्हा आम्ही हैदराबादमध्ये लष्करी कारवाई करू'.[२] हैदराबाद मधील परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत होती. पंडित जवाहरलाल नेहरू व सरदार वल्लभभाई पटेल यांना हैदराबादमध्ये कठोर कारवाई करावी लागेल. याची जाणीव झालेली होती. राजकीय स्तरावर चर्चेच्या फेऱ्या मात्र चालू होत्या. निजाम सरकार कोणते ना कोणते कारण सांगून वेळ घालविण्याचे काम करीत होते.

९ सप्टेंबर १९४८ रोजी दिल्ली येथे मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीमध्ये १३ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबादमध्ये पोलीस कारवाईला प्रारंभ करावयाचा निर्णय घेण्यात आला. १३ सप्टेंबरच्या पहाटे चार वाजता भारतीय सैन्य दलाच्या कारवाईला सुरुवात झाली. हैदराबाद संस्थान स्वतंत्र करून भारतीय संघराज्यात विलीन करून घेण्यासाठी झालेली ती कारवाई 'पोलीस ॲक्शन' या नावाने जनमानसात प्रसिद्ध आहे. तर भारतीय सैन्यदलाची 'ऑपरेशन पोलो' या सांकेतिक नावाने इतिहासात ती नोंदली गेलेली आहे. हैदराबाद मधील कारवाई ही लष्कराने केलेली कृती होती. तिचे मुख्य संचालक लेफ्टनंट जनरल महाराज राजेंद्र सिंहजी हे होते. आणि त्यांच्या मदतीला मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी, मेजर जनरल डी. एस. ब्रार, मेजर जनरल ए. ए. रुद्र, ब्रिगेडियर शिवदत्त सिंग, एअर व्हॉइस मार्शल मुखर्जी हे लष्करी अधिकारी होते. मेजर जनरल जयंतीनाथ चौधरी हे सोलापूरहून प्रवेश करणाऱ्या सशस्त्र दलाचे कमांडर होते. सर्वात महत्त्वाची जबाबदारी या विभागाकडे होती. मेजर जनरल डी. एस. ब्रार हे सोलापूरच्या उत्तरेला मुंबई विभागातील दलाचे कमांडर होते. मेजर जनरल ए. ए. रुद्र हे मद्रास समितीचे कमांडर होते. ब्रिगेडियर शिवदत्त सिंग हे मध्यप्रांत व वऱ्हाड कडील कमांडर होते तर एअर व्हॉइस मार्शल मुखर्जी हे संपूर्ण हवाई हालचालीचे व कृतीचे नियंत्रक होते.[३] निजामी सैन्याचे नेतृत्व जनरल अल इद्रीस यांच्याकडे होते. १३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय फौजा पाच वेगवेगळया ठिकाणावरून निजामाच्या हैदराबाद संस्थानात घुसल्या. पाच ठिकाणावरून मुख्य चढाई आणि शिवाय इतर आठ ठिकाणावरून एकाच वेळी सहाय्यभूत हल्ले असे या ऑपरेशन पोलोचे स्वरूप होते.[४]

१३ सप्टेंबर १९४८ रोजी भारतीय सेनेची मुख्य फळी सोलापूर मार्गे संस्थानात घुसली. हा पश्चिम बाजूने केलेल्या प्रभावी हल्ला होता. नळदुर्ग पासून २३ किलोमीटर अंतरावर भारतीय सैन्य पोहोचले. हे अंतर पार करून नळदुर्ग जवळ असलेला पूल झपाट्याने काबीज करणे हे सैन्याचे लक्ष होते. कारण निजामी सैन्यातील एक भाडोत्री अधिकारी हा पूल नष्ट करण्यासाठी निघालेला आहे, अशी वार्ता कळली होती. सकाळी सहा वाजण्याच्या आत भारतीय सैन्याने हा पूल काबीज केला. नळदुर्गच्या किल्ल्यावरील उपळी बुरुजावर दडून बसलेल्या निजामी सैन्याच्या एका तुकडीसही त्यांनी जेरबंद केले.[५] रजाकार आणि निजामी सैन्य यांच्यावतीने कुठेही प्रतिकार झाला नाही. लोक भारतीय सैन्याला हरप्रकारे मदत करत होते. काही सरकारी अधिकारी मात्र कार्यालय सोडून आपला जीव वाचवण्यासाठी हैदराबादकडे निघून जात होते. निजामी सैन्याचा उत्साह खचला होता. त्यांच्या मनामध्ये एक गोष्ट निश्चित झाली होती

की, एवढ्या मोठ्या प्रदेशाच्या सेनेपुढे आपले काही चालणार नाही.[६] त्या दिवशी भारतीय सैन्याने अदिलाबाद, जळकोट, तुरोरी ही गावे जिंकली. इकडे उस्मानाबाद जिल्ह्यात तुळजापूर, परभणी जिल्ह्यात माणिकगड, कनेरगाव आणि विजयवाडा जवळचे बोनाकल ही गावे पहिल्या दिवशी भारतीय सेनेने काबीज केली.

१४ सप्टेंबर रोजी चाळीसगावकडून कूच केलेल्या तुकडीने औरंगाबाद जिल्ह्यातील कन्नड आणि दौलताबाद ही ठिकाणी जिंकली. तसेच बुलढाणाकडून शिरलेल्या सैन्याने जालना शहरावर आपला ताबा मिळवला..त्यामुळे औरंगाबाद शहर अगदी दृष्टीपथात आले. इकडे जनरल चौधरी यांच्या नेतृत्वाखालील सैन्य राजेश्वर मार्गे सूर्यापेठ येथे पोहोचले. तेथून सिकंदराबाद केवळ ६० किलोमीटर अंतरावर होते. इकडे उस्मानाबाद आणि येरमाळा ही ठिकाणेही सैन्याच्या ताब्यात आली. शिवाय याचदिवशी वरंगल आणि बिदर येथील विमानतळावर भारतीय विमान दलाचे प्रखर हल्ले झाले.[७]

१५ सप्टेंबर रोजी पहाटे उस्मानाबाद जिल्ह्यातील मुरुड येथे असलेल्या निजामी सैन्याच्या तुकडीने लातूर रोड स्टेशन पर्यंत माघार घेतली. औरंगाबाद आणि हुमनाबाद ही शहरे भारतीय फौजांच्या ताब्यात आली. शहागडचा महत्त्वाचा पूलही त्यांनी काबीज केला. वरंगल जिल्ह्यातील खम्मम शहर ताब्यात आले. बिदर वरील विमानांचे बॉम्ब हल्ले सुरू होते. रजाकरांनी आणि निजामी फौजांनी बिदर ते जाहिराबाद या मार्गावर कडवा प्रतिकार केला. परंतु चिवटपणे धडका मारत भारतीय सैन्य जहीराबाद पासून केवळ आठ किलोमीटर अंतरावर येऊन ठेपले.[८] पूर्वेकडून चढाई करणाऱ्या भारतीय सैन्याच्या तुकडीला सूर्यापेठ येथे मोठा प्रतिकार झाला.

१६ सप्टेंबर रोजी सूर्यापेठ भारतीय सैन्याच्या ताब्यात आले. त्यानंतर या तुकडीने नारकर पल्ली आणि चित्त्यालकडे कूच केली. परभणी जिल्ह्यात सैन्याने हिंगोली शहर जिंकले. मुनिराबाद रेल्वे स्टेशन ताब्यात घेऊन निजामाचा मोठा शस्त्रसाठाही जप्त केला. इकडे जहीराबाद मध्ये होणारा सगळा प्रतिकार मोडून काढून सैन्याने झहीराबादवर ताबा मिळवला.[९]

१७ सप्टेंबर हा दिवस उगवला. हैदराबाद भोवती तैनात असलेल्या निजामी फौजांनी लिंगमपल्लीपर्यंत माघार घेतली. दुपारी दीड वाजता भारतीय सैन्याचे प्रमुख जनरल राजेंद्रसिंह यांनी हैदराबादचे सैन्य प्रमुख जनरल अल इद्रुस यांना रेडिओ ध्वनिक्षेपक द्वारा शेवटचा इशारा दिला होता की, 'आपकी सेना चारो और से घिर चुकी है शरण आओ' त्याच दिवशी बिदर शहर आणि तेथील विमानतळ ताब्यात घेतले. भारतीय सैन्य हैदराबाद शहराच्या दिशेने सदाशिव पेठपर्यंत येऊन पोहोचले होते. आता भारतीय सेना सर्व बाजूंनी हैदराबाद शहराजवळ पोहोचली होती. दुसऱ्या दिवशी खुद्द हैदराबाद शहरावर हल्ला करण्याचे ठरले होते. त्यानुसार या अंतिम हल्ल्याची जोरदार पूर्वतयारी सुरू झाली. [१०] परंतु १७ सप्टेंबर रोजीच स्वतः निजामानेच हार कबूल करून सायंकाळी पाच वाजता हैदराबाद रेडिओ केंद्रावरून भाषण करून आपण हे युद्ध थांबवत असल्याचे सांगितले. निजामाने जरी १७ सप्टेंबर रोजी शरणांगती पत्करली असली तरी प्रत्यक्ष शरणांगती स्वीकारण्याचा समारंभ १८ सप्टेंबर रोजी झाला. या दिवशी विजयी भारतीय सैन्याने मोठ्या दिमाखाने हैदराबाद शहरात प्रवेश केला. आपल्या एका अंगरक्षकासह हैदराबादचे लष्कर प्रमुख जनरल अल इद्रूस भारतीय लष्कराकडे आले आणि हैदराबाद शरण येत असल्याचे सांगितले. जनरल जे. एन. चौधरी यांनी ही शरणांगती लष्करी इतमामात स्वीकारली व भारतीय लष्कराने हैदराबादचा ताबा घेतला. अवघ्या १०९ तासात ही कारवाई पूर्ण झाली.[११] हैदराबाद संस्थानात मुक्तीची पहाट उगवली. हैदराबादच्या चारमिनारवर सव्वादोनशे वर्षापासून फडकत

असलेला आसफजाई झेंडा १०९ तासात कायमस्वरूपी उतरवला गेला. आणि त्या ठिकाणी तिरंगा ध्वज डौलाने फडकू लागला. कासिम रजवीला त्याच्या मेहुण्याच्या घरी अटक करण्यात आली. सात वर्षाची शिक्षा भोगून १९५६ मध्ये तुरुंगातून त्याची सुटका झाली. त्यानंतर कासिम रजवी मुंबईहून कराचीला गेला. १० जानेवारी १९७० रोजी तो पाकिस्तानत मरण पावला.

**संदर्भसूची**

१. देशमुख लक्ष्मीकांत व धारूरकर वि. ल. (संपा.), *मुक्तीसंग्राम,* मराठवाडा साहित्य परिषद, औरंगाबाद, १९९८, पृ. १३१

२. दै. *एकमत,* दि. १८ डिसेंबर २०२२, पृ. ४

३. दै. *एकमत,* दि. २५ डिसेंबर २०२२, पृ. ४

४. जोगदंड लक्ष्मीकांत व धारूरकर वि. ल.(संपा.), *उपरोक्त,* पृ. १३२

५. कित्ता, पृ. ७७

६. प्रा. डॉ. लोखंडे चंद्रशेखर, *हैदराबाद मुक्तिसंग्राम का इतिहास,* श्री घोडमल प्रहलादकुमार आर्य धर्मार्थ ट्रस्ट, हिंदौन (राज.), २००४, पृ. ४४९

७. देशमुख लक्ष्मीकांत व धारूरकर वि. ल. (संपा.), *उपरोक्त,* पृ. ७७

८. कित्ता, पृ. ७८

९. जोगदंड लक्ष्मीकांत व धारूरकर वि. ल. (संपा.), *उपरोक्त,* पृ. १३४

१०. कित्ता, पृ. ७८

११. प्रा. डॉ. लोखंडे चंद्रशेखर, *हैदराबाद मुक्तिसंग्राम का इतिहास,* उपरोक्त, पृ. ४५२-४५४